दै. सत्यप्रभा

# आफीम विक्री करणारा आरोपी गजाआड



**नांदेड,दि.७ –** शहरातील सचखंड शीख हॉस्टेल भागात अमली पदार्थ आफीमची विक्री करणाऱ्या एका तरुणास गजाआड करण्याची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केली आहे.

जिल्ह्यात ऑपरेशन फ्लश आऊट सद्या जोरात राबविण्यात येत आहे. त्यानुसार अमली पदार्थ बाळगणाऱ्या आणि विक्री करणाऱ्या विरुध्द कारवाई करण्यासाठी

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय, सपोनि आर. डी. वटाणे, फौजदार आनंद बिच्चेवार व पोलीस कर्मचाऱ्यांनी महसूलचे राजपत्रीत अधिकारी तथा नायब तहसीलदार यांच्या समक्ष शहरातील सचखंड शिख हॉस्टेल इमारतीच्या परिसरात सापळा रचून आफीम विक्री करणाऱ्या सुखविंदरसिंघ सुरेंद्रसिंघ कालो (वय २८) रा. गुरुद्वारा गेट नं.४, बडपुरा, नांदेड याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ २७ ग्रॅम आफीम व इलेक्ट्रीक वजनकाटा असा मुद्देमाल आढळून आला.त्या तरुणास स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आफिम नेमका कोठून आणण्यात आला याविषयी पोलीस शोध घेत असल्याचे सांगण्यात आले आहे.

दै. उद्याचा मराठवाडा



# आफीम विक्री करणाऱ्यास 'एलसीबी'कडून अटक

नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड शहरातील सचखंड शीख हॉस्टेल इमारतीच्या परिसरात आफीम विक्री करणाऱ्या एका युवकास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम नांदेड जिल्ह्यात सुरू आहे. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागातील फौजदार आनंद बिच्चेवार यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेली माहितीनुसार, शुक्रवारी शहरातील सचखंड शीख हॉस्टेल भागात एक युवक आफीम विक्रीसाठी येणार आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय, सपोनी आर.डी. वटाणे, फौजदार आनंद बिच्चेवार व पोलीस कर्मचाऱ्यांनी सापळा रचून महसूलचे राजपत्रित अधिकारी तथा नायब तहसीलदार एस.व्ही. दिगलवार व शासकीय पंचासमक्ष सचखंड शिख हॉस्टेल इमारतीच्या जवळील झुडपात छापा मारला. त्या ठिकाणी झुडपात सुखविंदरसिंघ सुरेंद्रसिंघ कालो (वय २८, रा. गुरुद्वारा गेट नं. ४, बडपुरा, नांदेड) यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ २७ ग्रॅम आफीम व इलेक्ट्रीक वजनकाटा असा ऐवज जप्त केला.